जिल्हा परिषद अहिल्यानगर
लघु पाटबंधारे विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर
या विभागाकडिल योजनांची नावे

---

- सामुहिक लाभाच्या योजना
- 2702 जिल्हा वार्षिक योजना (साठा व को.प.बंधारे)
- आदिवासी क्षेत्रात संपुर्ण शासकीय खर्चाने उपसा सिंचन योजना
- जलयुक्त शिवार अभियान 2.0

## सामुहिक स्वरुपाच्या योजना –

1. राज्य शासन सहाय्यित योजना :-

अ) योजनांतर्गत योजना :- राज्य शासनाने पंचवार्षिक योजनेव्दारा निश्चित केलेल्या धोरणांनुसार योजनांसाठीनिधी उपलब्ध करुन दिला जातो. लघुपाटबंधारे योजनाखालील प्रमाणे आहेत.

1). लघुपाटबंधारे (स्था.क्षेत्र) योजना (साठा बंधारे ) :-

1. तांत्रिक दृष्टया योग्यतेनुसार साठा बंधारे याची कामे हाती घेतले जातात. ज्या ठिकाणी नदी / नाल्याच्या दोन्ही तीरावर पुरेशि उंची आहे अशा ठिकाणी साठा बंधा-यांची कामे घेण्यात येतात. अशा प्रकारची साठा बंधा-याची कामे पुर्वी दगडी बांधकामात केले जात होती. आता संपुर्ण बंधा-याचे काम सिमेंट कॉंक्रिटमध्ये करण्यात येत आहेत. या कामासाठी राज्य शासनाकडुन योजनांतर्गत निधी प्राप्त होतो. आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रासाठी स्वतंत्र पणे निधी उपलब्ध होत आहे.

2). कोल्हापुर पध्दतीचे बंधारे घेणे (को.प.बंधारे ) :-

ज्या ठिकाणी नदी / नाला पात्र उथळ आहे. व पुराचे पाणी मोठया स्वरुपात आहे. त्या ठिकाणी को.प.बंधा-याची कामे घेण्यात येतात. यात पुराचे पाणी सुरक्षित पणे जाण्यासाठी गेटची संख्या जास्त ठेवली जाते. व पावसाळयानंतर वाहुन जाणारे नदी/ नाल्यातील पाणी आडवुन त्याचा सिंचनासाठी वापर करता येतो. 5 दश लक्ष घनफुट क्षमतेपर्यंत पाणीसाठा होणा-या व 30 हेक्टर पेक्षा जास्त सिंचन क्षेत्र उपलब्ध होणा-या ठिकाणी प्रामुख्याने को.प.बंधारे घेतले जातात. या को.प.बंधा-यांच्या कामासाठी राज्य शासनाकडुन योजनांतर्गत अनुदान प्राप्त होत आहे. आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रासाठी स्वतंत्रपणे निधी प्राप्त होत आहे.

3). आदिवासी क्षेत्रात संपुर्ण शासकीय खर्चाने उपसा सिंचन योजना घेणे :-

सदर योजना फक्त आदिवासी क्षेत्रासाठी लागु आहे. आदिवासी क्षेत्र हे डोंगराळ असल्यामुळे उपसा सिंचन योजनेची गरज आहे. आदिवासी लाभार्थींची स्वखर्चाने उपसा सिंचन योजना राबविण्याची आर्थिक कुवत नसल्यामुळे महाराष्ट्र शासनाने सन 1990 पासुन विशेष बाब म्हणुन आदिवासी क्षेत्रात ही योजना राबविण्याचा महत्वपुर्ण निर्णय घेतलेला आहे. या योजनेसाठी किमान 25 हेक्टर व त्यापेक्षा जास्त सिंचन क्षेत्र आवश्यक आहे. लाभार्थ्यांनी एकत्र येऊन उपसा सिंचन योजनेची मागणी केल्यास ही योजना राबविता येते.

4)जलयुक्त शिवार अभियान 2.0 –

महाराष्ट्र राज्यात पिकाच्या ऐन वाढीच्या कामळात पावसाची अनियमितता व पावसातील खंड यामुळे सतत टंचाई सदृश परिस्थिती निर्माण होऊन माठा परिणाम कृषि क्षेत्रावर होतो.राज्यातील सिंचनाच्या मर्यादित सुविधा ,अवर्षण प्रवण क्षेत्राची मोठी व्याप्ती ,हलक्या व अवनत जमिनीचे मोठे प्रमाण,अनिश्चित व खंडीत पर्जन्यमान यामुळे कृषी क्षेत्रात वाढत जाणारी अनिश्चितता हया बाबी विचारात घेवुन टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान 2.0 राबविण्यात येते.

सदर दुरुस्तीचे कामे पुर्ण झाल्यानंतर मुळ साठवण क्षमता व सिंचन क्षमता पुर्नस्थापित होते.